पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/३/कावि/१४१/२०१६
दिनांक - १४/०६/२०१६

**विषय :- केंद्रशासनाचे पोर्टलवरील (pgportal) तक्रारींबाबत....**

**परिपत्रक,**

केंद्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणेकामी व त्यावर वेळीच कार्यवाही होणेकामी नव्याने http://pgportal.gov.in हे पोर्टल सुरू केलेले आहे. सदर पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारी केंद्रशासनाकडून राज्य शासनाकडे पाठविल्या जाणार असून राज्य शासनाकडून संबंधित महानगरपालिकांकडे ऑनलाईन पाठविल्या जाणार आहेत. त्यामुळे सदर पोर्टलवरद्वारे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित विभागांना ऑनलाईन प्राप्त होणार असून विभागाने त्यावर गांभिर्याने दखल घेऊन विहीत मुदतीत कार्यवाही करावी.

सदर पोर्टलच्या वापराबाबतचे प्रशिक्षण दि. १६/०६/२०१६ रोजी सकाळी १०:३० वा. ऑटोक्लुस्टर, मुंबई पुणे रोड, चिंचवड येथे आयोजित केले असून सदर प्रशिक्षणासाठी आपले विभागातील तक्रारींसंदर्भात कामकाज करणारे अधिकारी / कर्मचारी व कॉम्प्युटर ऑपरेटर यांना पाठविणेत यावे. प्रशिक्षणाचेवेळी आपल्या विभागाचे User ID व Password उपलब्ध करून दिले जाणार असून त्याद्वारे संबंधितांनी नियमीत कामकाज करावयाचे आहे.

pgportal वर प्राप्त झालेल्या तक्रारी संबधित विभागांना ऑनलाईन पाठविणेची कार्यवाही नागरी सुविधा केंद्रामधील तक्रार निवारण कक्षामार्फत करण्यात येईल. तसेच pgportal वरील प्राप्त तक्रारींची पूर्तता ज्या त्या विभागाने संबंधित कामांसाठी निश्चित केलेल्या कालमर्यादेतच पूर्ण करावी. सदर पोर्टलवरील तक्रारींची वेळीच दखल न घेतलेचे निदर्शनास आल्यास संबंधित विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

pgportal चे वापराबाबत अधिकारी / कर्मचारी यांना काही तांत्रीक अडचणी असल्यास आपले विभागातील कॉम्प्युटर ऑपरेटर अथवा माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत :- नागरी सुविधा केंद्र

प्रति - सर्व विभाग / विभागप्रमुख / संबंधित कर्मचारी